# जनसंपर्क अधिकारी

## पोलीस आयुक्तालय, मिरा-भाईदर, वसई-विरार

पोलीस आयुक्त यांचे कार्यालय

**कार्यालयाचा पत्ता-** रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि. ठाणे फोन नंबर ०२२ - २९४५१००१

**Email ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


प्रेस नोट ०५/२०२५ दि. ०४/०१/२०२५

**अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष नालासोपारा गुन्हे शाखा मि.भा.व.वि. यांचेकडुन ७४२ ग्रॅम वजनाचा १८,५००/-रु. किंमतीचा गांजा हा अंमली पदार्थ जप्त करण्यात यश**

मि.भा.व.वि. पोलीस आयुक्तालय गुन्हे शाखा वरिष्ठांनी अंमली पदार्थ खरेदी- विक्री करणाऱ्या इसमांचा शोध घेवुन त्यांचेकडे काही आक्षेपार्ह चिजवस्तु मिळुन आल्यास कायदेशीर कारवाई करणेबाबत वरिष्ठांनी तोंडी आदेश दिले होते. त्या अनुषंगाने दि. ०२/०१/२०२५ रोजी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाचे पोलीस निरीक्षक सौरभी पवार व पोलीस पथक असे परिमंडळ २ व ३ मध्ये पेट्रोलींग कामी रवाना झाले होते.

पेट्रोलींग दरम्यान नारंगी फाटक ,विरार पुर्व ता.वसई जि.पालघर या ठिकाणी एक इसम हा खाऊच्या टपरीवर संशयास्पद स्थितीत मिळुन आला असुन त्याची पंचांसमक्ष झडती घेतली असता सदर इसमाचे कब्ज्यात ७४२ ग्रॅम वजनाचा १८,५००/-रु. किंमतीचा गांजा हा मिळुन आला. सदरचा गांजा हा अंमली पदार्थ व्यवसायिक प्रमाणात त्याने स्वतःचे टपरीवर विक्रीकरीता बाळगला असताना मिळुन आले आहे. सदर अंमली पदार्थ अंगझडती पंचनाम्यामध्ये जप्त करण्यात आला आहे. नमुद इसम नामे जानकी बलई यादव वय ७२ वर्षे रा. विरार पुर्व ता.वसई जि.पालघर,मुळ रा.उत्तर प्रदेश याचे विरुध्द एन.डी.पी.एस कायदा १९८५ चे कलम ८(क),२० (ब),२९ प्रमाणे विरार पोलीस ठाणे गुन्हा नोंद क्र.००३/२०२५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई हि मा.पोलीस उपआयुक्त श्री.अविनाश अंबुरे,पोलीस उप आयुक्त सो (गुन्हे), सहायक पोलीस आयुक्त श्री.मदन बल्लाळ (गुन्हे शाखा), यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखा नालासोपारा युनिटचे पोनि/सौरभी पवार,तसेच सफौ/उमेश गवई, मपोहवा/ साक्षी डोईफोडे, पोहवा/महेंद्र शेटये, चालक पोहवा/सुनिल पागी, सर्व नेम.अनै.मा.वा.प्र.कक्ष नालासोपारा यांनी उत्कृष्ठरित्या पार पाडली आहे.

-------------------------------------